# मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर यांचे कार्यालय

" वनवर्धन ", प्रधान डाक घरासमोर, ताराबाई पार्क , कोल्हापूर - ४१६ ००३.

☎ कार्यालय-०२३१/२६५३६३२, निवास-२६५३६३४, फॅक्स-२६५९२३३ E-mail-ccftkolhapur@gmail.com


---

फॅक्स/ई-मेल

क्रमांक कक्ष-४-३/आस्था/कुंठीतता/१२/ 3056

कोल्हापूर-३ दिनांक २८ ऑगस्ट २०१४.

प्रति,

महासंचालक,कुंडल विकास प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी(वने)कुंडल

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक आणि वनसंवर्धन तज्ञ,पुणे,

मुख्य वनसंरक्षक,वन्यजीव कोल्हापूर

वनसंरक्षक,कार्य आयोजना,कोल्हापूर.

उपवनसंरक्षक,कोल्हापूर/सातारा/सावंतवाडी

उपसंचालक,सामाजिक वनीकरण विभाग,

कोल्हापूर/सातारा/सांगली/रत्नागिरी/सिंधुदुर्ग(ओरोस)

विभागीय वन अधिकारी,सांगली/रत्नागिरी(चिपळूण)

**विषय:- राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करणे बाबत (पहिला लाभ)**

महाराष्ट्र शासन वित्त विभाग निर्णय क्रमांक वेतन-११०९/प्रक्र-४४/सेवा-३ दिनांक १ एप्रिल २०१० प्रमाणे राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना त्यांचे पदावर सेवा प्रवेशोत्तर १२ वर्षाचा कालावधी पूर्ण झालेवर वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी देणेचे अनुषंगाने विहित कार्यपध्दती अवलंबिण्यात येणार आहे.

दिनांक ३१/३/२०१५ अखेर ज्या कर्मचाऱ्यांना **सद्याचे पदावर १२ वर्षाचा कालावधी पूर्ण होत आहे आणि त्यांना अनुज्ञेय असलेला पहिला लाभ अद्याप मंजूर केलेला नाही अशा कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय पहिला लाभ देणे प्रकरणी त्यांची पात्रता आजमाविणेसाठी या कार्यालयात विभागीय पदोन्नती समितीची सभा लवकरच आयोजित करणेत येणार आहे.**

वर नमुद केलेल्या शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे अधिकारी/कर्मचारी यांची संवर्गवार माहिती (लिपीक,लेखापाल,वनरक्षक,वनपाल,सर्व्हेक्षक,कनिष्ठ सांखिकी,जीप चालक, शिपाई, पहारेकरी इ.संवर्गातील कर्मचारी ज्यांचे विभागीय व वृत्त स्तरावर गोपनीय अहवाल जतन केले जातात त्यांची माहिती) सोबतचे विहित प्रपत्रात सादर करावी. या माहिती सोबत संबंधित कर्मचाऱ्यांचे मागील ५ वर्षाचे गोपनीय अहवाल वर्षवार पताका लावून संचिके सोबत जोडून पाठविणेत यावेत. अपूर्ण गोपनीय संचिका जोडण्यात येवू नयेत. सोबत जोडलेल्या प्रपत्रात संवर्गवार माहिती या कार्यालयास दिनांक ३१/८/२०१४ पर्यत न चुकता खास दुतामार्पत सादर करावी.

सदरची माहिती सादर करताना दिनांक ३१/३/२०१५ अखेर १२ वर्षाचा कालावधी पूर्ण झाला परंतु त्यांना पहिल्या लाभांअंतर्गत देय असलेली वरिष्ठ वेतन श्रेणी मंजूर करणेत आलेली नाही अशा कोणाही अधिकारी/कर्मचाऱ्याची माहिती वगळली जाणार नाही याची दक्षता घ्यावी. अन्यथा अशा कर्मचाऱ्याना अनुज्ञेय लाभा पासून वंचित राहावे लागलेस त्यांची सर्वस्वी जबाबदारी आपले कार्यालयाची राहिल याची नोंद घ्यावी.

(एम.के.राव)
मुख्य वनसंरक्षक(प्रादेशिक) कोल्हापूर

आस्था
website वर
२८/८

D:\Chindake\APY_14-15\APY_14-15.docx

महाराष्ट्र शासन,वित्त विभाग निर्णय क्रमांक वेतन-१९०९/प्रक्र-४४/सेवा-३ दिनांक १ एप्रिल २०१० प्रमाणे कर्मचाऱ्यांना त्यांचे पदावर १२ वर्षाचा कालावधी पूर्ण झालेवर वरिष्ठ पदाची वेतन श्रेणी मंजूर करणेकामी पात्रता ठरविणेकामी माहिती.

दिनांक ३१/३/२०१५ रोजी अगर तत्पूर्वी------------- संवर्गात सलग सेवेची १२ वर्षे पूर्ण केलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची माहिती.

प्रपत्र

| नांव व पदनाम | ------- संवर्गात नेमणूकीचा दिनांक | सदर पदावर सेवेस १२ वर्षे पूर्ण केलेची तारीख | प्रशिक्षित/ अप्रशिक्षित | शैक्षणिक पात्रता | जात प्रवर्ग | जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त/ अप्राप्त | मालमत्ता दायित्व प्रमाणपत्र प्राप्त/ अप्राप्त | विभागीय परिक्षा पास झालेचा दिनांक | सद्य: स्थितीत विभागीय चौकशी सुरु अथवा प्रस्तावित आहे अगर कसे तसेच विभागीय चौकशीत दिलेली शिक्षा भोगत असल्यास त्याचा तपशिल | यापूर्वी पदोन्नतीस अपात्र ठरविले आहे किंवा पदोन्नती नाकारली आहे काय? |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |

| गोपनीय अहवालाचा तपशिल | | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| २००९-२०१० | २०१०-२०११ | २०११-२०१२ | २०१२-२०१३ | २०१३-२०१४ | |
| ११अ | ११ ब | ११ क | ११ ड | ११ इ | १२ |